# - स्त्री विषयक विचार -

## स्त्री विषयक विचार -

कालिदासीय ग्रंथांचा विचार करतांना आपल्याला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे कालिदासाचे बरचसे ग्रंथ हे नायिकाप्रधान आहेत. त्याच्या ग्रंथातील, विशेषत: तीनही नाटकांतील नायिका या नायकांच्यापेक्षाही रसिकांचे मन आपल्याकडे अधिक आकर्षून घतात. अग्निमित्रापेक्षा मालविका ही रसिकांच्या मनाला मोहित करते, पुरूरव्यापेक्षा उर्वशी ही रसिकांचे मन अधिक जिंकते व दुष्यन्तापेक्षा शकुन्तला हीच रसिकांच्या मनावर जास्त ठसते. काव्याच्या बाबतीत विचार करतां, यक्षापेक्षा यक्षपत्नीचे भावचित्र मनाला अधिक भावते, कुमारसंभवामध्ये शंकरापेक्षा पार्वतीचे व्यक्तिमत्त्व रसिकांचे चित्त अधिक हरण करते. रघुवंशामध्ये रामापेक्षा सीता आणि अज राजापेक्षा इंदुमती वाचकांच्या अधिक लक्षांत राहतात. तसेच इतर स्त्रियांच्या बाबतीत औशीनरी, धारिणी, इरावती, निपुणिका, बकुलावलिका, चित्रलेखा, प्रियंवदा या सर्वजणी आपापल्या व्यक्तिमत्वाचा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटविल्याशिवाय राहात नाही. या सर्वांचा अर्थ एकच की, कालिदासाच्या ग्रंथातील पुरूषसृष्टीपेक्षा स्त्रीसृष्टी ही [प्रेक्षकांच्या] रसिकांच्या मनाला अधिक मोहित करते, हे निश्चित. या सर्वच स्त्रियांच्या माध्यमातून कालिदासाने स्त्रियांच्या बहुविध स्वभावाचे दर्शन प्रेक्षकांना घडवले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या स्त्रियांच्या द्वारा त्याने उलगडून दाखविले आहेत. त्यांचे प्रेम, माया, राग, लोभ, त्याग इ. सर्वच गोष्टींचे हृदयंगम दर्शन आपल्या ग्रंथातून त्याने घडविले आहे. या संदर्भात डॉ. वि. वा. मिराशी आपल्या "कालिदास" नामक ग्रंथात म्हणतात - "कालिदासाच्या ग्रंथातील पुरूषपात्रापेक्षा त्याच्या ग्रंथातील स्त्री-पात्रांनी रसिकांचे मन आकर्षित केलेले आहे. त्याने आपल्या ग्रंथात धारिणी, औशीनरी, पार्वती, उर्वशी, इरावती, मालविका, यक्षपत्नी, शकुंतला, प्रियवंदा, अनसूया, सुदक्षिणा, इंदुमती व सीता ही महत्त्वाची १३ स्त्री पात्रे निर्माण केली आहेत. या सर्व स्त्रिया भिन्न

भिन्न स्वभावाच्या आहेत. तसेच या सर्व स्त्रियांच्यात एक साम्य आहे व ते म्हणजे त्या प्रेमळ आहेत. [पा. क्र. २१०].

या सर्व स्त्रियांचा एकत्रितपणे आपण जेव्हा विचार करतो तेव्हा आपल्याला स्त्री-स्वभावाची कांही वैशिष्टये प्रकर्षाने दिसून येतात. त्यातील पहिले वैशिष्टय म्हणजे प्रेम. या स्त्रिया ज्या व्यक्तीवर मनापासून प्रेम करतील त्या व्यक्तीसाठी त्या जीव सुध्दा ओवाळून टाकतील किंवा कोणत्याही मार्गाने त्या व्यक्तीचे प्रेम आपल्याला मिळावे म्हणून प्रयत्न करतील. स्त्रियांच्या बाबतीत हे २ प्रकार दिसून येतात. कारण साधारणत: स्त्रिया या स्वभावत: हळव्या असतात. त्यामुळे त्या आवडत्या माणसाचा विरह सहन करूं शकत नाहीत. या संदर्भात कालिदास म्हणतो - इष्टप्रवासजनितान्यबलाजनस्य

दु:खानि नूनमतिमात्रदु:सहानि ।। अभि. शां. ४/३.

- "आवडत्या माणसाच्या विरहामुळे निर्माण झालेली स्त्रियांची दु:खे खरोखरच पराकाष्ठेची दु:सह असतात."

या विरहामुळेच शकुंतला, सीता, यक्षपत्नी या विरहिणी अत्यंत दु:खी आहेत. या पतिव्रता स्त्रिया या केवळ दुर्दैवाच्या तडाख्यात सापडल्यामुळे पतीपासून वियुक्त झालेल्या आहेत. त्यामुळे त्या दूषण आपल्या पतीला न देता स्वत:च्या नशिबाला देत आहेत, व त्यांच्या आठवणीवर आपले दिवस कंठीत आहेत. शकुंतला ही एखाद्या तपस्विनी प्रमाणे स्वर्गात आपला काळ व्यतीत करीत आहे. तर सीता पुन्हां रामच पती म्हणून पुढच्या जन्मी मिळावा म्हणून तपश्चर्या करणार आहे. तर यक्षपत्नी पतीच्या वियोगाने झुरणीस लागलेली आहे. मालविका ही-ही आपल्या प्रियकराशी आपले कधीतरी मीलन होईल आणि आपला हा वनवास संपेल म्हणून अनेक संकटांना तोंड देत आहे. या सर्वच स्त्रियांमध्ये,आपल्या पतीवरील वा प्रियकरावरील अत्यंतिक प्रेमामुळेच, त्याच्या प्राप्तीसाठी कितीही दु:खे सहन करण्याची त्यांची तयारी आहे. सर्वस्वाचा त्याग या प्रेमासाठी करण्याची त्यांची तयारी आहे. या विरहावस्थेमध्ये त्या आपला वेळ कसा काढतात,तर [त्यांच्या] प्रियकर वा पतीच्या आठवणीं-

मध्ये त्या रमतात हे शकुंतलेवरून आपल्याला दिसून येते, किंवा त्या पती वा प्रियकर येण्याची वाट पाहात दिवस मोजीत असतात. असे कालिदास मेघदूतांत म्हणतो -

शेषान्मासान्विरहदिवसस्थापितस्यावधेर्वा
विन्यस्यन्ती भुवि गणनया देहलीदत्तपुष्पैः ।
मत्सङ्गं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती
प्रायेणैते रमणविरहेष्वङ्गनानां विनोदाः ॥ मेघ.उत्तर.२४

- "अथवा विरह झाल्या दिवसापासून शापकालाचे शिल्लक राहिलेले महिने उंबरठयावर मांडलेल्या फुलांनी मोजून जमिनीवर ठेवीत असलेली, अथवा मनोमन माझ्याशी संभोग सुखाचा आस्वाद घेत असलेली. [ तुझ्या दृष्टीस पडेल. ] कारण साधारणपणे प्रियकराचा विरह झाला असता अशा गोष्टींच स्त्रियांचा वेळ घालविण्याचा उपाय असतो. म्हणजे अशा प्रकारच्या गोष्टींनींच स्त्रिया आपला वेळ घालवीत असतात."

कालिदासाचे स्त्रियांच्याबद्दलचे बारीक निरीक्षण यातून आपल्याला दिसते. अशा विरहाच्या काळांत त्यांना प्रियकराचा वा पतीचा नुसता निरोप आला तरी इतका आनंद होतो. त्याचे वर्णन करतांना कालिदास म्हणतो की,

"कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किंचिदूनः । मेघ.उत्तर.३७

- "मित्राने आणलेला पतीचा निरोप स्त्रियांना जवळजवळ भेटीसारखाच असतो." आणि म्हणूनच यक्ष मेघामार्फत आपल्या पत्नीला संदेश पाठवण्याचे ठरवतो. कारण त्याच्या विरहावस्थेत झुरणीस लागलेल्या तिला आपण पाठविलेल्या संदेशाने पतीभेटीचे सुख प्राप्त होईल असे त्याला वाटते.

यक्षपत्नीला यक्ष एक वर्षानी परत भेटणार असल्याची खात्री तरी आहे. म्हणून त्या आशेवर ती आपले शापकालाचे दिवस कंठत आहे. पण शकुंतला व सीता यांच्याबाबतीत पती भेटीची शक्यता ही कमीच आहे. तरीही सीतेला पुनर्जन्मांत आपले आपल्या पतीशी कायमचे मीलन होण्याची आशा आहेच. म्हणजे मनुष्य अखेर आशेवर जगत असतो, आशा जी असते ती माणसाला

सर्व गोष्टी सहन करावयास लावते, असे कालिदास म्हणतो -

आशाबन्ध: कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां
सद्य:पाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि ।। मेघ. पूर्व.१०.

- "साधारणपणे आशावन्तु सुकुमार स्त्रियांच्या प्रेमळ फुलाप्रमाणे [कोमल] असलेल्या व विरह झाला असतां एकदम ठाव सोडणा-या अंत:करणाला सावरून धरतो."

कालिदासाच्या वरील सर्वच नायिका या आशातन्तुवर आपले जीवन व्यतीत करीत आहेत. हा आशातन्तु म्हणजे त्यांच्या पतीचे वा प्रियकराचे त्यांच्यावर निरातिशय प्रेम आहे, व एक दिवस आपले आपल्या प्रियकराशी मीलन होईल असे त्यांना वाटते. [सीतेच्या बाबतीत या नाही तर पुढच्या जन्मी तरी आपल्याला एकमेकांचा वियोग सहन करावयास लागू नये ही तिची अपेक्षा आहे.]

पतीसाठी सर्वस्वाचा त्याग करणा-या वरील पतिव्रता स्त्रियांच्या प्रमाणेच इरावती, उर्वशी, औशीनरी व धारिणी या ही स्त्रिया आहेत. ज्यांचे आपल्या पतीवर अतिशय प्रेम आहे. यामधील इरावती राणीचे आपल्या पतीवरील म्हणजे अग्निमित्रावरील प्रेम व उर्वशीचे आपल्या पतीवरील म्हणजे पुरुरव्यावरील पहिल्या ३ अंकापर्यंतचे प्रेम हे भोगाधिष्ठित आहे. त्यामुळे त्यांना आपल्या प्रेमाच्या मार्गात येणा-या स्त्रीचा व पर्यायाने आपल्या पतीचाही अतिशय राग येतो. त्याचा परिणाम म्हणून इरावती शेवटपर्यंत मालविकाग्निमित्रम् नाटकांत मालविकेला त्रास देऊ पाहते. आपल्याला न मिळालेले सुख इतरांनाही न मिळावे असा प्रयत्न करते. व पतीचाही राग करते. उर्वशी ही "विक्रमोर्वशीयम्" नाटकांत आपल्या पतीवर म्हणजे पुरुरव्यावर, त्याने परस्त्रीकडे टक लावुन पाहिले म्हणून रागावुन निघून जाते. म्हणूनच या दोघींचेही आपल्या पतीवर खूप प्रेम आहे हे निश्चित, पण ते प्रेम स्वार्थी आहे. कोणत्याही परिस्थितीत त्या ते प्रेम मिळवूं इच्छितात. औशीनरी

आणि धारिणी राणीचा विचार करतां त्यांनाही आपल्या प्रेमाच्या मध्ये भागिदारीण आलेली आवडत नाही आणि कोणत्याही स्त्रीला ही गोष्ट आवडणारच नाही. यामुळे आपल्या पतीचे दुस-या स्त्रीवर प्रेम बसले आहे हे ऐकतांच प्रथम त्याही रागावतात, चिडतात, पतीला वाटेल तसे बोलतात. पुन्हा आपले प्रेम आपल्याला मिळावे म्हणून प्रयत्नही करतात. परंतु अखेर या सर्वांत अपयश आल्यावर आपल्या पतीच्या सुखांतच सुख मानून आपणच त्यांच्या मार्गातून दूर होतात. म्हणूनच या दोघींच्या बाबतीत त्यांच्या स्वार्थी प्रेमाचे नि:स्वार्थी प्रेमांत रूपांतर होते. स्त्रीसुलभ स्वभावानुसार त्यांच्या प्रथम उलट प्रतिक्रिया झाल्या असल्या तरी त्या उदार अंत:करणाच्या असल्यामुळे स्वसुखाचा विचार दूर सारून पतीच्या सुखाचाच फक्त विचार करतात. म्हणूनच धारिणी राणी मालविका व अग्निमित्र यांचा विवाह स्वत: जुळवते व औशीनरी राणी "प्रियानुप्रसादन" नामक व्रताने आपल्या पतीचे ज्या स्त्रीवर प्रेम बसले आहे तिच्याशी त्याचे मीलन होण्याची इच्छा करते. उर्वशीलाही तिचे वेलीत रूपांतर झाल्यानंतर आपण आपल्या पतीवर रागावून निघून गेल्याचा पश्चात्ताप झाला आहे.

थोडक्यात पाहतां या सर्वच स्त्रिया पतिव्रता आहेत. त्यांचे त्यांच्या पतीवर वा प्रियकरावर अतिशय प्रेम आहे. पण या प्रेमाच्या मार्गात अडथळा आल्यानंतर ते प्रेम पुन्हा परत मिळविण्यासाठी होणा-या त्यांच्या प्रतिक्रिया भिन्न आहेत एवढेच. हेच प्रेम मिळविण्यासाठी पार्वतीने स्वत:च्या सौंदर्याचा आणि ऐश्वर्याचा त्याग करून कठोर तपश्चर्या आरंभली आहे.

म्हणजेच स्त्रियांचे प्रेम हे मनापासून व उत्कट असते हे निश्चित. त्यामुळे मेघदूतात कालिदास स्त्रीस्वभावाविषयी म्हणतो कीं -

एकप्रख्या भवति हि जगति अङ्गनानां प्रवृत्ति: । [मेघ. उत्तर २५]

- "जगांत सर्व स्त्रियांचा स्वभाव हा एकसारखा असतो" हे त्याचे वचन या स्त्रियांच्या प्रेमळ स्वभावाविषयीही लागू पडते. या प्रेमळ स्वभावामुळेच

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्या मैत्रिणी आपल्या मैत्रिणीला यक्षपत्नीला सोडून जाणार नाहीत असे यक्ष खात्रीपूर्वक सांगतो.

या सर्वच स्त्रियांच्या मध्ये आणखीन एक समान गुण असतो. तो म्हणजे त्या स्वाभिमानी असतात. त्यामुळे स्वत:ची विनाकारण झालेली मानहानी त्या अजिबात सहन करत नाहीत, मग त्या तामसी प्रवृत्तीच्या असोत वा सात्त्विक प्रवृत्तीच्या असोत. त्यांचा त्यांच्या पतीवर प्रेमाचा अधिकार असतो तरीही त्या विनाकारण पतीवर रागवत नाहीत असे कालिदास म्हणतो. -

प्रभवन्त्योऽपि हि भर्तृषु कारणकोपा: कुटुम्बिन्य: । [मालविका १/१८]

- "भार्या पतीवर प्रभाव गाजवित असल्या तरी देखील कारण असेल तरच त्या रागावतात."

अशा परिस्थितीत विनाकारण जर त्याना पतीकडून वा अन्य कोणाकडून मानहानी पत्करावी लागली तर त्यांचा सात्त्विक संताप उफाळून येतो, हे शकुन्तलेनी दुष्यन्ताला भर दरबारात दिलेल्या प्रत्युत्तरांवरून, तसेच पतीने त्याग केलेल्या सीतेने लक्ष्मणामार्फत रामाला पाठविलेल्या निरोपावरुन आपल्याला दिसून येते. शकुन्तलेनी आपल्या पत्नीपदाचा त्याग करणा-या दुष्यन्ताची भर दरबारांत हजेरी घेतली, तर सीतेने आपला त्याग करणा-या रामाला तुझ्या कुळाला हे शोभण्यासारखे आहे काय ? असा परखड प्रश्न [लक्ष्मणामार्फत] रामाला विचारला. या सात्त्विक प्रवृत्तीच्या स्त्रियांची प्रतिक्रिया अशा रीतीने झाली, तर स्वभावत:च ज्या तामसी प्रवृत्तीच्या आहेत त्यांची प्रतिक्रिया कशी झाली असेल याचा विचारच केलेला बरा. उर्वशी ही या स्वाभिमानापाई पतीला सोडून निघून जाते. तर इरावती अग्निमित्राचा खरपूस समाचार घेते व अखेरपर्यन्त त्याला विरोध करीत राहते. धारिणी ही मालविकेला नजरकैदेत ठेवते तर औशीनरी राणी पुरुरव्यावर रागावून निघून जाते. अशा रीतीने या सर्वच कालिदासीय स्त्रिया स्वत:च्या झालेल्या मान-

हानीने नुसत्याच गप्प न बसतां त्या अपमानाबद्दलचा जाब विचारल्याशिवाय राहात नाहीत. या सर्व स्त्री चित्रणांतून स्त्रियां या स्वाभीमानी असतात हेच सिध्द होते.

स्त्रियांच्या बाबतीतले आणखी एक वैशिष्टय कालिदासाने स्पष्ट केले आहे. ते म्हणजे -

"निसर्गनिपुणा: स्त्रिय:" [मालविका. ३].

- "स्त्रिया या निसर्गत:च निपुण असतात." या त्यांच्या चातुर्यामुळेच अग्निमित्र इरावतीची प्रमदवनांतील झोपाळ्यावर बसण्याची विनंती नाकारण्याची इच्छा करतो. कारण त्याचे मालविकेवर प्रेम बसले आहे ही गोष्ट आपल्या बोलण्यांवरून, वागण्यांवरून ती बरोबर ताडणार आणि ती आपल्यावर रागावणार असे त्याला वाटते. कारण पतीच्या वागण्यांत, बोलण्यांत जरा जरी बदल झाला तरी स्त्रियांना तो कळल्याशिवाय राहात नाही हे त्याला पूर्णपणे माहित आहे. आपले प्रेम लपविण्यासाठी समजा जर आपण तिची जास्त स्तुती केली तरी तिला त्याबद्दल संशयच येईल असे त्याला वाटते. या संदर्भात कालिदास अग्निमित्राच्या द्वारा स्त्रियांच्या बाबतीत एक सर्वसाधारण नियम सांगतो. तो म्हणतो -

उचित: प्रणयो वरं विहन्तुं
बहव: खण्डनहेतवो हि दृष्टा: ।
उपचारविधिर्मनस्विनीनां
न तु पूर्वाभ्यधिकोऽपि भावशून्य: ।।३।। मालविका. ३

- "रीतसर विनंती नाकारणे बरे, कारण नकाराची अनेक कारणे आढळतात. पण पूर्वीपेक्षा जास्त पण भावनाहीन असे शिष्टाचाराचे पालन मानिनी स्त्रियांशी बरे नव्हे." या श्लोकांत कालिदास सांगतो की, स्त्रियांना, ज्याच्यामध्ये भावना नाही अशी खोटी स्तुति वा प्रेम अजिबात आवडत नाही. अशा प्रेमामुळे उलट एकमेकांवरील अविश्वास वाढतो. या कारणास्तव इरावतीच्या विनंतीला सरळ

सरळ नकार देणे हे योग्य असे अग्निमित्र विदूषकाला म्हणतो. या संदर्भात कालिदास आणखी एक गुप्त गोष्ट सांगतो ती म्हणजे -

"अन्यसङ्क्रान्तप्रेमाणो नागरा भार्यायामधिकं दक्षिणा भवति ।"

[विक्रमो -3]. - चित्रलेखा

- "दुस-या प्रेयसींवर मन जडलेल्या चतुर व्यक्ती पत्नीच्या बाबतीत अधिक उदार असतात." ही गोष्ट स्त्रियांना माहित असल्याने इरावती माझ्यावर रागावणार असे त्याला वाटते.

आपल्या या स्त्रीसुलभ चातुर्याने पुरुष स्वभावाचे हे मर्म ओळखून चित्रलेखा दु:खी झालेल्या उर्वशीची समजूत काढते की, आता जरी औशीनरी राणीची मनधरणी व तिची स्तुती महाराज करीत असले तरी तुझ्यावर असलेले त्यांचे प्रेम तिला कळू नये म्हणून हा खोटा आव ते आणीत आहेत. तेव्हा तू दु:खी होऊ नकोस.

या मानी स्त्रियांच्या बाबतीत आणखीन एक वैशिष्टय कालिदास सांगतो, की,

"अवधूतप्रणिपाताः पश्चात्संतप्यमानमनसोऽपि ।

निभृतैर्व्यपत्रपन्ते दयितानुनयैर्मनस्विन्यः ।। विक्रमो 3/5

-" प्रियतमांद्वारा केलेल्या प्रणाम इ. चा अव्हेर करणा-या मानी स्त्रियां नंतर दु:खी होतात व एकान्तात प्रियतमांनी केलेला अनुनय आठवून लज्जित होतात." म्हणूनच औशीनरी राणीला आपण आपल्या पतीच्या [प्रेमाची] अनुनयाची अवहेलना केली म्हणून दु:ख झाले व पतीला प्रसन्न करण्यासाठी तिने "प्रियानुप्रसादन" नावाचे व्रत केले.

या स्त्रियांच्या चातुर्यामुळेच महत्त्वाच्या बाबतीत मुख्यत: विवाह इ. च्या बाबतीत त्यांचा सल्ला महत्त्वाचा ठरतो, असे कालिदास पुढील श्लोकांत म्हणतो.

"प्रायेण गृहिणीनेत्रा: कन्यार्थेषु कुटुम्बिन्य: I कुमार ६/८५

– "मुलीच्या विवाहाच्या बाबतीत गृहस्थ बहुतेक आपल्या गृहिणींच्या मतालाच प्राधान्य देतात" म्हणून हिमालयाने पार्वतीच्या लग्नासंबंधी मेनेचा अभिप्राय विचारला. याच स्त्रियांच्या चातुर्यामुळे विवाहाच्या बाबतीत त्यांचे साहाय्य महत्त्वाचे ठरते असे कालिदास पुढील श्लोकात सांगतो.

"आर्याप्यरुन्धती तत्र व्यापारं कर्तुमर्हति I
प्रायेणैवंविधे कार्ये पुरन्ध्रीणां प्रगल्भता II कुमार ६/३२

– "पूज्य अरुंधती याबाबतीत साहाय्य करण्यास योग्य आहे. कारण साधारणपणे अशा विवाहादींच्या बाबतीत कौटुंबिक स्त्रिया याच जास्त चतुर असतात." स्त्रियांची असणारी दूरदृष्टी, चौफेर दृष्टी, सूक्ष्म नजर व चौकस बुध्दी इ. सर्वच गोष्टींचा विचार करुन कालिदासाने मांडलेले हे विधान स्त्री स्वभावाचे द्योतक आहे.

कोणतीही गोष्ट ही विस्तृतपणे न सांगता नेमक्या शब्दांत मांडणे व त्याचे नेमके तत्त्व विशद करणे हे कालिदासाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. ते त्याचे वैशिष्ट्य याही ठिकाणी आपल्याला दिसून येते. या सर्व स्त्री स्वभाववर्णनपर श्लोकांमधून कालिदासाने स्त्री-जीवनाचा चलत् चित्रपटच जणू आपल्या डोळ्यासमोर उभा केला आहे.

कालिदास स्त्रियांच्या चातुर्याविषयी सांगतांना म्हणतो की, हे स्त्रियांचे चातुर्य हे फक्त मानवातच नव्हे तर ते पक्ष्यांच्या बाबतीतही दिसून येते. या संदर्भात "अभि.शा."त आलेला श्लोक असा की,

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत या: प्रतिबोधवत्य: I
प्रागन्तरिक्षगमनात्स्वमपत्यजात –
मन्यैर्द्विजै: परभृता: खलु पोषयन्ति II अभि.शां. ५/२२

- "स्त्रियांचा उपजत धूर्तपणा पक्ष्यांच्या जातीतही दिसून येतो, मग बुध्दीची देणगी ज्यांना लाभली आहे अशा स्त्रिया धूर्त असल्या तर त्यांत काय नवल ? आपली पिले आकाशांत संचार करण्यास समर्थ होईपर्यन्त कोकिळा दुस-या पक्ष्यांकडून त्याचे पोषण करीत असतात."

मानव व मानवेतर सृष्टीविषयीचे असणारे कालिदासाचे सूक्ष्म निरीक्षण हे खरोखर प्रशंसनीय आहे यात शंकाच नाही. वरील श्लोकांतून कोकिळेच्या चातुर्याद्वारा कालिदासाने संपूर्ण स्त्री जातीच्या धूर्तपणाबद्दल जे विधान केले आहे ते थोडया फार फरकाने सत्य आहे असे आपल्याला दिसून येते. शकुंतलेचा पत्नी म्हणून अस्वीकार केल्यानंतर ती अनेक प्रकारे दुष्यन्त राजाला आपण त्याची पत्नी असल्याचे दाखले देते. यावर राजा तिच्यावर स्वार्थीपणाचा आरोप करतो व गौतमी शकुन्तलेचे समर्थन करीत असतांना दुष्यन्त राजा उत्तरादाखल वरील विधान करतो व संपूर्ण स्त्रीजातीच्या स्वभावाचे एक वैशिष्टय सांगतो.

या स्त्रियांच्या चातुर्यामधून त्यांच्या ठिकाणी येतो तो हजरजबाबीपणा. याबद्दल कालिदास म्हणतो कीं, —

"इदं तत्प्रत्युत्पन्नमति स्त्रैणमिति यदुच्यते । [अभि. शा. ५]

- "स्त्रिया मोठया हजरजबाबी असतात" असं जे म्हणतात त्याचा हा घ्या पुरावा.

शकुंतला, राजाने दिलेल्या अंगठीने त्याला आठवण देऊ पाहते पण अंगठी बोटात नसल्यामुळे ती शचीतीर्थात पडली असावी अशी शंका गौतमी व्यक्त करते. त्यावर दुष्यन्त राजा स्त्रियांच्या हजरजबाबीपणाविषयी विधान करतो. हजरजबाबीपणासाठी प्रसंगावधान, बुध्दिमत्ता व चातुर्य या सर्व गोष्टी असाव्या लागतात व त्या सर्व गोष्टी स्त्रियांच्या मध्ये असतात असेच कालिदासाला याठिकाणी सूचित करावयाचे आहे.

संपूर्ण स्त्री-जातीविषयी कालिदासाने केलेली वरील विधाने कदाचित् त्याने स्वानुभवावरून केली असावीत. एका दंतकथेप्रमाणे पत्नीच्या सांगण्यावरून कालिमातेची उपासना केल्यामुळे तो विद्वान झाला व आपल्या पत्नीमुळे आपला पुनर्जन्म झाला असे वाटल्यामुळे त्याने आपल्या पत्नीला "गुरु" मानले. त्यामुळे तिने दिलेल्या शापामुळे त्याचा मृत्यू एका वेश्येकडून झाला. म्हणजेच पत्नीशिवाय त्याचे इतरही स्त्रियांशी संबंध होते असे त्याच्यावरील दंतकथेवरुन वाटते. त्यामुळे त्याच्या सहवासात आलेल्या स्त्रियांच्यावरून त्याने ही विधाने कदाचित केली असावीत. या सर्व स्त्रियांच्या चिकित्सक स्वभावामुळेच विक्रमो. मध्ये कञ्चुकी पुढील विधान करतो कीं, —

अहो स्त्रीषु कष्टोधिकार: । [विक्रमो. ३/१]

– "स्त्रियांच्या सेवेत राहणे मोठे कष्टकारक असते." "कुमारसंभवात कालिदासाने यासंदर्भात आणखी एक विधान केले आहे. ते म्हणजे

"कठिना: खलु स्त्रिय: ।। कुमार. ४/५ ।।

– "स्त्रिया या खरोखर निष्ठुर असतात."

स्त्रियांच्याबद्दल आदर बाळगणारा कालिदास हा त्यांच्या मध्ये असणा-या दुर्गुणांच्याकडेही दुर्लक्ष करीत नाही तर ती गोष्ट स्पष्टपणे आणि स्वच्छपणे तो मांडतो. स्त्री जातीविषयीचा त्याच्या मनामध्ये वसत असणारा आदर हा आंधळेपणाने निर्माण झालेला नाही तर डोळसपणे त्यांच्या गुणावगुणांची पारख करूनच त्याने स्त्री-स्वभावाची चित्रे आपल्यासमोर रेखाटली आहेत, हेच कालिदासाच्या या स्त्री-स्वभाव परीक्षणावरून आपल्याला दिसून येते. या परीक्षणाचा आणखी एक नमुना म्हणजे -

" अत्यारूढो हि नारीणामकालज्ञो मनोभव: ।। [रघु. १२/३३]

– "बरोबरच आहे स्त्रियांच्या कामाचा अतिरेक झाला म्हणजे त्यांना काळवेळेचे भान राहात नाही." असे कालिदास म्हणतो. या मदनातिरेकामुळे रामावर मोहित झालेली रावणाची धाकटी बहीण शूर्पणखा सीतेच्या देखत रामाला हसिनी नाही

जगामध्ये अशाही कांही स्त्रिया असतात की ज्या खोटे बोलण्यात पटाईत असतात व आपल्या गोड बोलण्याची भुरळ पाडून त्या स्वत:चा स्वार्थ साधू इच्छितात. पण अशा स्त्रियांच्या बोलण्याला सर्वच लोक कांही बळी पडत नाहींत तर - स्वमादिभिरात्मकार्य निर्वर्तिनीनामनृतमयवाङ्मधुभिराकृष्यन्ते विषयिण: । [अभि. शां. ५]

- "स्वत:चा कार्यभाग साधू पाहणाऱ्या स्त्रियांच्या मधाप्रमाणे असलेल्या पण असत्याने भरलेल्या शब्दांना विषयलंपट लोक भाळतात."

ज्या व्यक्ती सज्जन आहेत त्या व्यक्ती अशा भुलथापांना बळी पडत नाहीत. अर्थात् कांहीच स्त्रियांच्या विषयी हे विधान कालिदासाने केले आहे सर्व स्त्रियांविषयी नाही.

प्रत्येक व्यक्तींमध्ये काही चांगले व कांही वाईट गुण हे वसतच असतात. स्त्रियांच्या मध्येही ते असतात व कालिदासाने ते वरीलप्रमाणे दाखवूनही दिले आहेत. परंतु स्त्रियांच्या मध्ये असणाऱ्या थोडयाशा दुर्गुणामुळे त्यांच्याविषयी अनादर बाळगणारा कालिदास नाही. उलट कालिदासाने स्त्रियांच्यामध्ये असणाऱ्या गुणांची कदर करून त्यांचा समाजातील दर्जा उंचावला आहे, जो दर्जा कालिदासाच्या पूर्वीच्या काळांत घसरला होता, असे आपल्यांला दिसून येते. वैदिक काळांत स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने होता. त्यांना सर्व बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य होते. त्या विवाह करून संसारही थाटू शकत होत्या, अथवा आजन्म ब्रह्मचारी राहून विद्येची उपासनाही करू शकत होत्या. अशा अनेक विदुषी प्राचीन काळी होऊन गेल्या व त्यांनी अनेक सूक्ते रचलेली आपल्याला दिसून येतात. हा त्यांचा दर्जा स्मृतिकाळांत घसरलेला आपल्याला दिसून येतो. त्यांचा वेदाभ्यासाचा अधिकार काढून घेतल्यामुळे कदाचित् त्यांची ही घसरण झाली असावी. या काळात स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. लहानपणी वडील, तरुणवयांत पती व वृध्दावस्थेत मुलाच्या अधिकाराखाली तिने राहावे असे मानले जात होते. म्हणजेच त्यांचे स्वातंत्र्य

पूर्ण लयाला गेले होते. त्या नरकाच्या भागिधारीण आहेत इथपर्यंत समाजाची मजल गेली होती. पण स्मृतिकाळांत स्त्रियांच्या दर्जाची चालू झालेली ही घसरण कालिदासाच्या काळांत थांबली. आणि फक्त थांबली एवढेच नव्हे तर तिचा दर्जा उंचावत गेला आणि तिला समाजांत एक वेगळे स्थान प्राप्त झाले. याचे बहुतांशी श्रेय कालिदास इ. सारख्या समाजसुधारक कवींना आहे. या बाबतीत कालिदासाने स्त्री-संबंधी काढलेले गौरवोद्गार पाहण्यासारखे आहेत.

इंदुमतीच्या मृत्यूनंतर सर्वस्व हरवलेला अज आपल्या पत्नीच्या संदर्भात म्हणतो कीं -

गृहिणी सचिव: सखी मिथ: प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ।। रघु. ८/६७

- " तुला हरण करून नेणा-या निर्घृण काळाने माझे काय बरे हरण करून नेले नाही ? सांग. गृहिणी नेली, मन्त्री नेला, विश्वासू मित्र नेला व सुंदर कलां-मधील आवडता शिष्य नेला. सर्व कांही नेले." या श्लोकांवरुन पत्नीला कुटुंबात किती महत्त्वाचे स्थान होते आणि संसारात ती फक्त पतीची उपभोग-वस्तु नसून मित्र, शिष्य, सल्लागार इ. सर्व कांही होती, हेच दिसून येते.

पुढीलही कांही श्लोकांवरून स्त्रियांचे बाबतीत कालिदासाचा पूरक दृष्टीकोन आपल्यांला दिसून येतो. कालिदास म्हणतो -

क्रियाणां खलु धर्म्याणां दांपत्यं मूलसाधनम् ।। कुमार. ६/१३

- "धार्मिक विधीच्या बाबतीत पती आणि पत्नी हेच त्याचे मूळ साधन आहे." या श्लोकार्धात स्त्रियांच्या शिवाय धार्मिक कृत्य असंभव आहे हेच कालिदासाला सांगावयाचे आहे.

या व अशा अनेक उल्लेखांवरून कालिदासाचा स्त्री-जातीविषयीचा आदर त्याच्या ग्रंथातून दिसून येतो. या संदर्भातच आपल्या "कालिदासाची सृष्टि" या पुस्तकांत त्याची स्त्री सृष्टि विषयक मते सांगतांना आळतेकर म्हणतात -

"कालिदासाने स्त्रियांची चित्रे ज्या पध्दतीने रेखाटली आहेत त्यावरून त्याला स्त्रियांच्याबद्दल आदर व कौतुक आहे. दाक्षिण्य आहे. बारीक सारीक वर्णनांतून त्याची ही उदार दृष्टी दिसून येते. "पत्नी" या शब्दाला त्याने फार महत्त्व दिले आहे. पत्नीचा दर्जा थोर आहे असे त्याने थोरामोठयांच्या मुखांतून दिलेले आहे. पत्नीबद्दल अनादर दाखविणा-यांवर त्याने कोरडे ओढले आहेत. अद्यापीही हिंदु समाजांत कुटुंबाला घेऊन फिरावयास जाणा-या पतीला लोक हसतात. पण दिलीप राजा वसिष्ठ मुनींच्या कडे जातांना पत्नीला बरोबर नेतो, व वाटेत मजेदार गोष्टी सांगून तिचे रंजन करतो. सैन्याच्या छावणीत एक हत्ती उधळतो व सर्वत्र धांदल होते. तेव्हा सैनिकांनी प्रथम स्त्रियांचे रक्षण केले असे वर्णन आहे. ती बारीक सारीक वर्णने वाचली की, Ladies first हे तत्त्व कालिदासाच्या कथनांत किती उत्तम प्रमाणांत दिसून येते हे दिसते." पुढे ते म्हणतात

"स्त्रियांच्याबद्दल कवीने काढलेला अपशब्द कालिदासीय साहित्यांत मिळणार नाही. स्त्रियांच्याबद्दल कालिदासाचा आदर अगदी अंत:करणापासून आहे. इहलोकांना स्वर्गाची पात्रता स्त्रीमुळे येते असे त्याचे म्हणणे आहे. थोडक्यांत स्त्रियांच्याबद्दल कालिदासाची दृष्टी अगदी आधुनिक आहे. कालिदासाची दृष्टी जरी सध्याच्या पुरुषवर्गात आली तरी हिंदु स्त्रियांची दु:स्थिती पुष्कळ सुधारेल अशी आशा लेखकानें व्यक्त केली आहे. आणि या स्त्री-दृष्टीबद्दलच्या उदार धोरणामुळेच "राष्ट्रीय कवीचा" मान कालिदासाला मिळाला आहे असे लेखक म्हणतो."

कालिदासाच्या सर्वच नायिका पतिव्रता आहेत. मग त्यांचे स्वभाव कसेही असोत. शांत असोत वा रागीट. पण पातिव्रत्याच्या बाबतीत त्या सर्व समान आहेत. आपल्या पतीवर त्यांचे प्रेम आहे ते उत्कट आहे. त्यामुळेच त्या आपल्या पतीवर प्रेमाचा अधिकार गाजवितात असे कालिदास म्हणतो.

प्रभुता रमणेषु योषितां नहि भावस्खलितान्यपेक्षते । ~~विक्रम.~~ ४/१२

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

– "स्त्रिया आपल्या प्रियकरांवर स्वामित्व गाजवितात पण त्यांनी नाराज होण्यासाठी सतत कोणती नां कोणती चूक हुडकत राहणे हे योग्य नाही." या स्त्रिया पतीवरील प्रेमापायी आपल्या सवतीचाही आनंदाने स्वीकार करतात. ही त्यांच्या पातिव्रत्याची थोरवी कालिदास पुढील नदीच्या दृष्टान्ताद्वारे देतो. तो म्हणतो –

प्रतिपक्षेणापि पतिं सेवन्ते भर्तृवत्सला: साध्व्य: ।
अन्यसरितां शतानि हि समुद्रगा: प्रापयन्त्यब्धिम् । [मालविका. ५/१९]

– "पतिपरायण साध्वी प्रतिपक्षी [सवत] स्वीकारून देखील पतीची सेवा करतात. जसे समुद्राला मिळणा-या [नद्या] इतरही शेकडो नद्यांना समुद्रापर्यंत पोचवतात."

या पतिव्रता धर्मानेच धारिणी राणीने मालविकेचा सवत म्हणून स्वीकार केला, आणि औशीनरी राणीने उर्वशीचा. खरोखर यांची आपल्या पतीवरील निष्ठा ही स्तुत्य आहे. म्हणून पुढे जाऊन कालिदास म्हणतो की,

भवन्त्यव्यभिचारिण्यो भर्तुरिष्टे पतिव्रता: ।। [कुमार. ६/८६]

– "पतीला इष्ट असलेल्या गोष्टींत पतिव्रतांची प्रतिकूलता नसते."
म्हणूनच पार्वतीच्या विवाहाच्या संदर्भात मेनेने पतीला संमति दिली. या स्त्रियांनी संपूर्ण जीवनच पतीसाठी वाहिलेले असते. त्यांचा साज-शृंगार हा पतीच्या प्रसन्नतेसाठीच असतो असे कालिदास म्हणतो.

प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता । [कुमार. ५/१]

– "वल्लभाच्या मनांत आपल्याविषयी आवड निर्माण करणे हेच स्त्रीच्या सौंदर्याचे खरे कार्य आहे." व ते कार्य करु न शकणा-या आपल्या सौंदर्याचा, पार्वतीने मदनदाहानंतर म्हणूनच तिरस्कार केला. या संदर्भातच पुढील श्लोक पहा, " स्त्रीणां प्रियालोकफलो हि वेष: । [कुमार. ७/२२]

– " प्रियेने आकर्षक वेषभूषा कशासाठी करावयाची ? प्रियाने ती पहावी म्हणूनच."

... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

म्हणून विवाहाची उंची वेषभूषा करून पार्वती शंकराच्या आगमनाची वाट पहात राहिली असे कालिदास म्हणतो. या सर्व श्लोकांवरून पतिव्रता स्त्रियांचा सर्व साज शृंगार हा पतीला प्रसन्न करण्यासाठीच असतो हे दिसून येते. फक्त साजशृंगारच नव्हे तर अशा रीतीने त्यांनी आपले जीवन हे आपल्या पतीला संपूर्णपणे वाहिलेले असल्यामुळे त्यांना एकमेकांचा वियोग अजिबात सहन होत नाही. स्त्रियांप्रमाणे पत्नीवर अंत:करणापासून प्रेम करणाऱ्या पतीलाही हा विरह सहन होत नाही. म्हणूनच "विक्रमोर्वशीयम्" नाटकांत पुरूरवा उर्वशीच्या विरहाने वेडा होतो व "उत्तररामचरितात" राम सीतेच्या विरहाने धाय मोकलून रडतो. आणि रघुवंशात अज इंदुमतीच्या मृत्यूने. याठिकाणी पत्नीबद्दल पतीला असणारे नितांत प्रेम हेच नाटककाराला सांगावयाचे असल्याने त्यांनी हे प्रेमाचे अतिरेकी वर्णन केले आहे. अर्थात याला अतिरेकी वर्णन म्हणता येत नाही. कारण ही वस्तुस्थिती आहे. ज्या व्यक्तींवर माणसाचे प्राणापलिकडे प्रेम असते त्या व्यक्तींच्या वियोगामुळे त्याच्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींची ही अवस्था होते. आणि स्त्रियांच्या बाबतीत त्या जास्तच हळव्या असल्यामुळे ती अधिकच तीव्र असते. यामुळेच मदनदाहानंतर रती ही सती जाण्यासाठी निघते. स्त्रियांचे हे पतीविषयीचे प्रेम व त्याचा विरह सहन न होण्यामुळे त्याच्या मागोमाग जाणे ही गोष्ट फक्त मानवसृष्टीतच दिसते असे नाही तर निसर्गात सुध्दा ही गोष्ट दिसून येते असे कालिदास म्हणतो. त्यासाठी त्याने एक उत्तम उदाहरण दिले आहे. खरोखर ते वाचल्यावर कालिदासाच्या सूक्ष्म निरीक्षणाचे आपल्याला कौतुक आणि आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. ते उदाहरण असे -

> शशिना सह याति कौमुदी
> सह मेघेन तडित् प्रलीयते ।
> प्रमदा: पतिवर्त्मगा इति
> प्रतिपन्नं हि विचेतनैरपि ।। [कुमार ४/३३]

- "चंद्राबरोबर चंद्रिका आणि मेघाबरोबर वीज नाहीशी होते. यावरून पतीच्या मागोमाग पत्नीने जावयाचे ही गोष्ट अचेतनांनी सुध्दां पत्करली

आहे. [हे दिसून येते]" कालिदासाने दिलेला दृष्टान्त त्याच्या कलेची आणि बुध्दीची साक्ष देणारा आहे.

याचा अर्थच असा की, स्त्रिया मग त्या कोणत्याही स्वभावाच्या असोत त्यांचे आपल्या पतीवरील प्रेम उत्कट असते. कालिदासाने भिन्न भिन्न स्वभावाच्या नायिकांच्या द्वारा हेच तत्त्व आपल्या ग्रंथातून प्रतिपादित केले आहे. पार्वती ही जिद्दी व स्वाभिमानी, औशीनरी व धारिणी ह्या विचारी, इरावती ही स्वार्थी, उर्वशी ही चंचल व यामुळे उथळ विचारांची, मालविका ही शांत व सोशिक आणि सीता, शकुंतला वा यक्षपत्नी या त्यागी. या सर्वच वेगवेगळ्या स्वभावाच्या नायिका वेगवेगळ्या मार्गाने पतीला आपलेसे करण्याचा व त्याचे प्रेम मिळविण्याचा प्रयत्न करतात. जगांत बहुतेक हीच परिस्थिती सर्वत्र दिसून येते. स्त्रियांच्या या नैसर्गिक व उत्कट प्रेमाचे "तत्त्व" अचूक हेरुन वेगवेगळ्या उदाहरणांद्वारा कालिदासाने ते प्रतिपादित केले आहे. त्याच्या या बुध्दिकौशल्यामुळेच आपण त्याला "तत्त्वज्ञ कालिदास" असे म्हणणे योग्य होईल.

स्त्री-स्वभावाचे आणखीही एक वैशिष्टय कालिदास सांगतो. ते म्हणजे -

सखे कुतुहलवानपि निसर्गशालीन: स्त्रीजन: । [मालविका. ४]

- "मित्रा, स्त्रिया उत्सुक असूनसुध्दा स्वभावत: शालीन असतात."

या शालीनतेमुळे मनांतील गोष्ट विशेषत: प्रेमासारखी नाजूक गोष्ट त्या उतावळेपणाने व्यक्त करत नाहीत. या शालीनतेमुळेच प्रत्यक्ष महाराज समोर असतांना त्यांना न्याहाळूं न शकणारी मालविका चित्रांतील महाराजांना न्याहाळू शकली असे महाराजांना वाटते.

स्त्रियांच्या स्वभावाची वैशिष्टये ज्याप्रमाणे कालिदासाने दिलेली आहेत, त्याप्रमाणे स्त्रियांनी कसे वागावे याबाबतीतही त्याची कांही मते

त्याने स्पष्ट केली आहेत. अलिकडच्या काळांत कदाचित ही मते नवीन पिढीला पटणारी नाहीत. पण पूर्ण विचारांती ती बरोबर आहेत हे आपल्याला आजच्या काळांतही मान्य करावे लागते.

विवाहित स्त्रियांच्या बाबतीत त्या काळाला अनुसरून कालिदास लिहितो की,

सतीमपि ज्ञातिकुलैकसंश्रयां
जनोऽन्यथा भर्तृमतीं विशङ्कते ।
अत: समीपे परिणेतुरिष्यते
प्रियाऽप्रिया वा प्रमदा स्वबन्धुभि: ।। [अभि.शां. ५/१७]

- "ज्याचा पती हयात आहे अशी स्त्री नेहमी फक्त आपल्या नातलगांच्याच घरी राहात असली तरी, ती पतिव्रता असून सुद्धा लोक तिच्याविषयी भलभलत्या शंका घेऊन लागतात. म्हणून वयात आलेली स्त्री पतीला प्रिय असो किंवा अप्रिय असो, ती पतीजवळच राहिली पाहिजे असे तिच्या नातेवाईकांना वाटते."

शार्ङ्गरवाच्या द्वारा कालिदासाने विवाहित स्त्रियांच्या बाबतीत समाजाचे असणारे मतच या श्लोकाद्वारा व्यक्त केले आहे. आणि आजही जवळ जवळ बहुतांशी समाजाचे मत असेच दिसते. विवाहित स्त्री ही पतीजवळ न राहतां इतरत्र राहिली असतां समाज भलभलत्या शंका घेतो आणि तिची निंदा करतो हे सत्य आपल्याला समाजांत सर्वत्र आढळून येते. हे सत्य सुमारे २००० वर्षांपूर्वी कालिदासाने लिहून ठेवले होते. म्हणजेच आपल्याला यावरून असेही म्हणता येईल की सुमारे २००० वर्षांपूर्वी समाजाचे जे विचार होते तेच अजूनही आहेत.

पतीपत्नींचा दोघांचाही एकमेकांवर प्रेमाचा अधिकार असावा, म्हणूनच दोघांनी एकमेकांशी एकनिष्ठ असावे असे कालिदासाचे मत आहे. या संदर्भात प्रभवन्त्योऽपि ........ कुटुम्बिन्य: [मालविका. १/१८] आणि

प्रभुता रमयेषु....... न्यपेक्षते [विक्रमो अंक ४/१२] हे श्लोक पत्नीचा पतीवर अधिकार असतो या संदर्भात आहेत हे आपण पाहिलेच आहे. पुढील श्लोक पतीची सत्ता पत्नीवर असावी याबाबतीत आहे.

उपपन्ना हि दारेषु प्रभुता सर्वतोमुखी ।। [अभि.शां. ५/२६]
- "पत्नीवर पतीची संपूर्ण सत्ता असावी हे तर युक्तच आहे."

शाङ्गरवाने दुष्यन्त राजाला उद्देशून काढलेले हे उद्गार आहेत. अनेक प्रकारे पटवून देण्याचा प्रयत्न करूनही जेव्हां राजाला शकुंतला ही आपली पत्नी आहे हे पटत नाही. तेव्हां उगीच वाद करून काय उपयोग असा विचार करून शाङ्गरव म्हणतो कीं, "ही तुझी पत्नी आहे, हिचा त्याग कर अथवा स्वीकार कर, कारण पत्नीवर पतीची संपूर्ण सत्ता असावी हे तर युक्तच आहे" म्हणजे विवाहितेवर तिच्या माहेरच्या व्यक्तींचा नाही, तर पतीचाच संपूर्णतया अधिकार चालतो असेच कालिदासाचे मत यावरून दिसते. विवाहानंतर तिच्या बाबतचे योग्य ते निर्णय तिच्या पतीने घ्यावयाचे असतात असा त्या काळांत समज असावा व कालिदास त्या काळाला अनुसरून लिहीत असावा. शिवाय मनुस्मृतीचाही कालिदासाचा अभ्यास असावा. त्यामध्ये विवाहित स्त्रीवर पतीचा अधिकार असतो असे म्हटले आहे. अर्थात सत्ता किंवा अधिकार याचा अर्थ पतीने पत्नीला कसेही वागवावे असे त्याचे मत नव्हते हे याठिकाणी मुद्दाम स्पष्ट करावेसे वाटते. कारण कालिदास स्त्रियांचा आदर राखणारा होता हे आपण मागेच पाहिले आहे. शिवाय नकळत आपल्या हातून झालेल्या चुकांची माफी आपल्या पत्नीजवळ मागणारे दुष्यन्त राजासारखे राजेही त्याने चित्रित केले आहेत. म्हणजे या सर्वांवरून पत्नीही पतीपेक्षा संसारात कोणत्याही प्रकारे कमी नाही, असेच त्याला सांगावयाचे आहे. परंतु विवाहितेने पतीजवळच राहावे असे व दोघांनी एकमेकांशी निष्ठेने वागावे एवढेच त्याचे प्रामाणिक मत होते.

तसेच नववधूने सासरच्या मंडळीच्या बरोबर कसे वागावे याबाबतीतही

कालिदासाने कांही विचार मांडले आहेत. शाकुंतलेची सासरी पाठवणी करतांना कण्व मुनी तिला याबाबतीत उपदेश करतात तो असा,

शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मा स्म प्रतीपः गमः ।
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ।। [अभि.शां. ४/१८]

- "आणि इथून तू आपल्या पतीच्या घरी गेलीस म्हणजे वडीलधा-या माणसांची सेवा कर, प्रियमैत्रीणींशी वागतेस त्याप्रमाणे सवतींशी वाग, पतीनी तुझा एखादा अपराध केला तरी रागावून त्याच्या मनाविरुध्द वागू नकोस, सेवकांशी फारच सौजन्याने वाग, आणि वैभवाने गर्विष्ठ होऊं नकोस, अशा प्रकारे तरुण स्त्रियांना "गृहिणी" ही पदवी प्राप्त होते, विपरीत वर्तन असणा-या स्त्रिया आपल्या कुळाला कलंक लावतात."

या सर्वांचा मथितार्थ एवढाच की, सर्वांशी मिळून मिसळून वागून तू सर्वांची आवडती हो. म्हणूनच "नववधूने नम्र असावे उध्दट असू नये" हा संदेश कालिदासाला येथे सांगावयाचा आहे. आणि असा उपदेश प्रत्येक पिता आपल्या सासरी जाणा-या कन्येला सांगेल. या ठिकाणी शब्दशः अर्थ घेण्यापेक्षा त्याचा भावार्थ घेणे योग्य होय. कालिदासाने रंगविलेल्या नायिकाही या त्याच्या मताना अनुसरुन वागणा-या आहेत असे आपल्याला दिसून येते.

स्त्रियांना आपल्या जीवनामध्ये अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. कन्या, प्रेयसी, पत्नी आणि माता या त्या भूमिका होत. पैकी कालिदासाच्या ग्रंथात स्त्री जीवनातील प्रेयसीच्या भूमिकेचे विशेषेकरुन वर्णन केलेले आपल्याला दिसून येते. कारण कालिदासाचा "शृंगार" हा आवडता रस होता. त्या रसाला अनुसरुन त्याने प्रियकर - प्रेयसींच्या प्रेमावर आधारित म्हणूनच शृंगाराधिष्ठित अशीच तीनही नाटके रचली आहेत व काव्यामध्येही याच प्रकारचे वर्णन त्याने केले आहे. कन्या, पत्नी वा माता या संदर्भातील

त्याचे विचार हे कमी प्रमाणांत त्याच्या ग्रंथात आढळून येतात. पुत्रवात्सल्याच्या संदर्भात कालिदासाने म्हटले आहे की, पुत्रवात्सल्य किंवा अपत्यप्रेम ही मानवामध्ये असलेली नैसर्गिक भावना आहे. स्त्रियांच्या ठिकाणी तर ती प्रकर्षाने असते. म्हणूनच म्हटले जाते कीं, "स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे". अपत्यावर नि:स्वार्थी, निरपेक्ष प्रेम करणारी माता म्हणूनच जगांत श्रेष्ठ ठरते. म्हणूनच "कुमारसंभवात" कार्तिकेयाला पाहताच पार्वतीला प्रेमाचा उमाळा फुटतो. शकुंतला मुलाच्या आधारावरच आपले पुढचे जीवन व्यतीत करीत असते. उर्वशीच्या बाबतीत मात्र परिस्थिती उलट दिसते. ती पतीप्रेमासाठी अपत्यस्नेहाचाही त्याग करते. पण जगाच्या पाठीवर अशी माता एखादीच असू शकेल. उलट सर्वच माता अपत्याच्या वात्सल्यापोटी प्राणांचीही पर्वा न करता स्वत: अनंत कष्टांना तोंड देतांना आपल्याला दिसून येतात. म्हणूनच तर त्यांना आपण गौरवितो. शकुन्तला, पार्वती, धारिणी, उर्वशी, इ. च्या संदर्भात कालिदासाचे मातविषयक कांही विचार आपल्याला दिसून येतात.

कन्येच्या संदर्भात कालिदासाचे विचार मुख्यत्वेकरून शाकुंतलाच्या चौथ्या अंकात दिसून येतात. तसेच पार्वतीच्या विवाहा संदर्भात "कुमारसंभवात" दिसून येतात.

शाकुंतलाच्या चौथ्या अंकात शकुंतलेची सासरी पाठवणी करतांना कण्वमुनींच्या मनाची झालेली अवस्था ही प्रत्येक पित्याच्या मन:स्थितीची निदर्शक आहे. म्हणून ती सार्वजनिक तसेच सार्वकालिकही आहे. कण्वमुनींच्या सारख्या ब्रह्मचारी व्यक्तिलाही आपल्या मानस कन्येला सासरी पाठवतांना इतके दु:ख होते मग प्रत्यक्ष जन्मदात्या माता-पित्यांची अवस्था काय होत असेल ? असा विचार कण्वमुनींच्या द्वारा कालिदास बोलून दाखवितो. तरीही त्यामध्येही प्रत्येक मातापित्याचा एका जबाबदारीतून मुक्त झाल्याचा आनंद कांही वेगळाच असतो, असे कालिदासाला वाटते. कारण त्यांना ही गोष्ट माहित असते की,

अर्थो हि कन्या परकीय एव । अभि. शां. ४

- "कन्या हे परक्याचे धन आहे." त्यामुळे ते आपल्याजवळ फार काळ ठेवून न घेता ज्याचे त्यांना परत देणे इष्ट. फक्त त्यामध्ये त्यांची अपेक्षा एवढीच असते कीं, मुलीला स्थळ चांगले मिळावे. म्हणजे मुलीची काळजी वाटत नाही. हाच विचार कालिदासाने पुढील श्लोकार्धात व्यक्त केला आहे.

अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता ।। कुमार ६/७९.

- "सुस्थळी पडलेल्या कन्येबद्दल पित्याला सचिंत असण्याचे कारण उरत नाही. [पुढे तिचे कल्याण होईल कीं नाही याबद्दल]"

म्हणूनच सप्तर्षी हिमालयाला [पार्वतीच्या पित्याला] म्हणतात कीं, तू पार्वती शंकराला देणेच योग्य आहे.

कण्वमुनींनाही आपल्या मुलीची शकुंतलेची सासरी पाठवणी करतांना काळजी वाटली नाही. कारण तिने निवडलेला वर योग्यच आहे असे त्यांनी स्वतः म्हटले आहे. आपली मुलगी सुस्थळी पडलेली आहे याबद्दल त्यांना मुळीच शंका नाही. याबद्दल ते स्वतःच म्हणतात की -

संकल्पितं प्रथममेव मया तवार्थे
भर्तारमात्मसदृशं सुकृतैर्गता त्वम् ।
चूतेन संश्रितवती नवमालिकेय -
मस्यामहं त्वयि च संप्रति वीतचिन्तः ।। अभि. शां. ४/१३.

- "तुझे भाग्य थोर म्हणून तुझ्यासाठी मी पूर्वीच योजून ठेवलेल्या आणि स्वतःला अनुरुप असलेल्या पतीबरोबर तुझं मीलन झालं आहे. या नवमालिकेचं आम्रवृक्षाशीं मीलन झालं आहे. हिच्या बाबतीत आणि तुझ्याही बाबतीत माझी काळजी आता दूर झाली आहे." अर्थात् पुढील तिच्या आयुष्यांत घडलेली घटना म्हणजेच केवळ दैवयोग होय. पण वर निवडण्यांत तिची चूक नाही.

म्हणजे कन्येच्या बाबतीत ती सुस्थळी पडणे, तिच्या माता-पित्यांची काळजी दूर होणे होय. कालिदासाने कन्येच्या संदर्भात मांडलेले हे विचार हे प्रत्येक मातापित्याचे मनोगत व्यक्त करतात. कालिदासाचे हे वैशिष्ट्यच आहे कीं, प्रत्येक व्यक्तीच्या त्या त्या जीवनाशी एकरुप होऊन त्यांच्या मनाचे पापुद्रे तो हळुवार हातानी उलगडतो. व त्यांची मनोगते तो सूत्रबध्द करतो. स्त्री-जीवनाच्या विविध भूमिकांशी एकरुप होऊन त्याने उलगडून दाखविलेल्या त्यांच्या मनोगतांना म्हणूनच महत्त्व आहे. अशा रीतीने कालिदासाने आपल्या ग्रंथातील विविध स्त्री-पात्रांच्या द्वारा आणि स्वभावांच्या द्वारा स्त्री-जीवनातील कांही तत्त्वे उलगडून दाखविली आहेत. म्हणूनच त्याला "तत्त्वज्ञ कालिदास" म्हणणे याही बाबतीत योग्य होय.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR